# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** दिनांक - १७/०४/२०२४

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने एक महिला आरोपीसह सराईत ०३ ड्रग्ज तस्करांना अटक करून ४२ लाख किंमतीचा २१० ग्रॅम वजनाचा एम.डी.(मेफेड्रॉन) जप्त केलेबाबत..**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) गु.र.क्र.२१/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ **(आझाद मैदान युनिट)**<br>२) गु.र.क्र.२२/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(घाटकोपर युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक १६/०४/२०२४ व १७/०४/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) नागपाडा, मुंबई<br>२) अंधेरी, मुंबई. |
| **आरोपी संख्या** | एकूण ०३ आरोपी एक माहिला आरोपीसह |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण २१० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) अं.किं. रूपये ४२,००,०००/- |

(१) **<u>नागपाडा, मुंबई परिसरातून १२० ग्रॅम एम.डी. जप्त</u>** -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **आझाद मैदान युनिटचे** पथकाने दिनांक १६/०४/२०२४ रोजी नागपाडा, मुंबई या परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत एका इसमास अटक केले. त्यांचे ताब्यातून **१२० ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन' एकुण किं.अं. रुपये २४ लाख रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपीस दिनांक २२/०४/२०२४ रोजी पर्यंत मा.न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अटक आरोपी हा सराईत गुन्हेगार आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास आझाद मैदान युनिटचे सपोनि अमोल गवळी हे करत आहे.

(२) **<u>मरोळ, अंधेरी, मुंबई परिसरातून ९० ग्रॅम एम.डी. जप्त</u>** -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **घाटकोपर युनिटचे** पथकाने दिनांक १७/०४/२०२४ रोजी मरोळ, अंधेरी, मुंबई या परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत एकूण एका महिलेसह एक इसमास अटक केले. त्यांचे ताब्यातून **९० ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन' एकुण किं.अं. रुपये १८ लाख रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपीस दिनांक २०/०४/२०२४ रोजी पर्यंत मा.न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे नमूद गुन्हयातील अटक पुरूष आरोपी हा सराईत गुन्हेगार आहे. गुन्हयाचा पुढील तपास घाटकोपर युनिटचे सपोनि राघवेंद्र लोंढे हे करत आहे.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२४ मध्ये एकूण २२ गुन्हे दाखल करून त्यामध्ये एकूण ५५ आरोपींना अटक करत त्यांचे ताब्यातून एकूण ३४ किलो १५८ ग्रॅम वजनाचे विविध अंमली पदार्थ व १२०० कोडेन मिश्रीत कफ सिरप बॉटल्स असा एकूण अं.किं.रूपये ३०.२८ कोटी पेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केला आहे. तसेच सन २०२४ मध्ये मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करणारे एकूण १५ गुन्हे दाखल करून त्यामध्ये ४३ आरोपींना अटक केले असून, त्यांचे ताब्यातून एकूण ११.५ किलो पेक्षा अधिक वजनाचा किं.अं. रूपये २२.८० कोटी किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त केला आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. राजेंद्र शिरतोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, आझाद मैदान युनिटचे प्रभारी पो.नि.राजेंद्र दहिफळे व घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि. श्रीमती लता सुतार, यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

------oooo------